# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 22.07.2025** **वार-मंगळवार**

---

**मेधा कुलकर्णी-संसद**

राज्याच्या ग्रामीण भागातील महिलांमध्ये कर्करोगाच्या वाढत्या संख्येबाबत राज्यसभा खासदार प्राध्यापक डॉक्टर मेधा कुलकर्णी यांनी काल संसदेत लक्ष वेधलं. कर्करोग नियंत्रणासाठी शासनाने प्रतिबंधात्मक उपायोजना त्वरित कराव्यात, अशी मागणी मेधा कुलकर्णी यांनी संसदेच्या पावसाळी अधिवेशनात लक्षवेधी सत्रात ही मागणी केली. ग्रामीण आणि वंचित भागांमध्ये वेळेवर निदान, त्वरित उपचार आणि सुविधा उपलब्ध करून देणं अत्यावश्यक असल्याचं त्यांनी नमूद केलं.

**मिसाळ**

कसबा मतदारसंघात स्वच्छतेच्या बाबतीत सुरू असलेले काम कौतुकास्पद असून जाहिरात फलक मुक्त कसबा तसंच पुणे शहर करण्यासाठी प्रशासनाने ठोस पावले उचलावीत. असे आवाहन राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी केले आहे. कचऱ्याची ठिकाण स्वच्छ करून त्यांचं सुशोभीकरण करण्याचा उपक्रम आमदार हेमंत रासने यांनी हाती घेतला होता. त्या अंतर्गत नागनाथ पार येथे छत्रपती शिवाजी महाराज आणि मराठा साम्राज्याच्या राजमुद्रांच्या शिल्पाचं अनावरण काल करण्यात आलं. या कार्यक्रमात माधुरी मिसाळ बोलत होत्या. महापालिका आयुक्त नवल किशोर राम, पुणे शहर पोलीस आयुक्त अमितेश कुमार, मतदारसंघातील पदाधिकारी, माजी नगरसेवक, कार्यकर्ते यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**परिचारिका संप**

विविध मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटनेच्यावतीने गुरुवारपासून संप पुकारण्यात आला आहे. या संपात पुण्यातल्या 340 परिचारिका सहभागी झाल्या असल्याने रुग्णसेवा विस्कळित झाली असून तातडीच्या वगळता अन्य नियोजित शस्त्रक्रिया पुढे ढकलल्या आहेत. रुग्णांच्या होणाऱ्या गैरसोयीवर उपाय म्हणून ससून प्रशासनाने खासगी वैद्यकीय महाविद्यालयांकडून परिचारिकांची मागणी केली आहे. आपत्कालीन रुग्णांवर उपचार आणि शस्त्रक्रिया या नियमितप्रमाणे होत आहेत, असं ससून रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. यल्लपा जाधव यांनी म्हटलं आहे.

**बालकुमार**

अमरेंद्र भास्कर मराठी बालकुमार साहित्य संस्थेतर्फे दिल्या जाणाऱ्या पुरस्कारांची घोषणा काल करण्यात आली. बालसाहित्य क्षेत्रात विपुल योगदान देणारे संभाजीनगर येथील ज्येष्ठ साहित्यिक बाबा भांड यांना यंदाचा जीवनगौरव पुरस्कार तर, वसई येथील ज्येष्ठ लेखिका आणि कवयित्री सिसिलिया कार्व्हालो यांची ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ कविवर्य ग. ह. पाटील पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. पुरस्कार प्रदान सोहळा येत्या 5 ऑगस्टला पुण्यात होणार आहे.

**जलजन्य आजार**

डेंग्यू, मलेरिया यांसारख्या कीटकजन्य आणि जलजन्य आजारांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेने 5 लाखांहून जास्त घरं, 28 लाख 93 हजार कंटेनर, 1 हजाराहून अधिक भंगार दुकाने, सुमारे दीड हजार बांधकाम स्थळे अशा विविध ठिकाणांची तपासणी केली आहे. त्यांपैकी 3 हजार 431 स्थळांना नोटीसा बजावण्यात आल्या असून 624 नागरिक आणि आस्थापनांवर थेट दंडात्मक कारवाई करत 22 लाख 24 हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. कीटकजन्य आणि जलजन्य आजारांबाबत नागरिकांमध्ये जागृती करण्यावरही आरोग्य विभाग विशेष भर देत आहे. आजारांचा धोका टाळण्यासाठी

नागरिकांनी देखील काळजी घ्यावी, दर आठवड्याला टाक्या आणि पाणी साठवणाऱ्या भांड्यांची स्वच्छता करावी, पाणी साठवणारी भांडी झाकून ठेवावीत, असं आवाहन महापालिकेनं केलं आहे.

**पाणीपुरवठा**

पुणे शहराचा वाढत असलेला विस्तार आणि त्यामुळे वाढणाऱ्या लोकसंख्येची पाण्याची गरज भागावी, यासाठी पुढील वर्षभरासाठी 21 टीएमसी पाणी पुणे शहराला द्यावे, अशी मागणी महापालिकेने पाटबंधारे विभागाकडे केली आहे. शहराला सध्याच्या वर्षासाठी लागणाऱ्या पाण्याचे अंदाजपत्रक पुणे महापालिकेने तयार केले असून त्यामध्ये ही मागणी करण्यात आली आहे. पुणे शहराची लोकसंख्या 84 लाख झाली असल्याचे या अंदाजपत्रकात स्पष्ट करण्यात आले आहे. महापालिका आयुक्त नवलकिशोर राम यांच्याकडे हे अंदाजपत्रक मान्यतेसाठी ठेवले जाणार असून, आयुक्तांच्या मंजुरीनंतर पाटबंधारे विभागाकडे पाठविण्यात येणार आहे.

**लम्पी**

पुणे जिल्ह्यात लम्पी त्वचारोगाचा प्रादुर्भाव वाढला आहे. यंदा साथ सुरू झाल्यापासून 578 जनावरांना लम्पीची लागण झाली असून, त्यापैकी आठ जनावरांचा मृत्यू झाला आहे. शिरूर तालुक्यात प्रादुर्भाव वाढला असून, शिरूरमध्येच 213 जनावरांना लम्पीची लागण झाली आहे. जिल्ह्यामध्ये सहा फिरत्या पशुचिकित्सा पथकाद्वारे पशुपालकांच्या दारात उपचार करण्यात येत असल्याचे पशुसंवर्धन विभागाचे उपायुक्त डॉ. अंकुश परिहार यांनी सांगितले.

**बांग्लादेशी**

पुणे शहरात वास्तव्य करणाऱ्या 16 बांग्लादेशी नागरिकांना त्यांच्या देशात पाठवण्यात येणार आहे. पुणे पोलिसांनी ही कारवाई केली आहे. यामध्ये 15 महिला आणि एका पुरुषाचा समावेश आहे. महिलांना पुणे विमानतळावरून, तर पुरुषाला मुंबई विमानतळावरून पाठवून दिले जाईल. पुणे पोलिसांनी 16 जुलैपासून बांगलादेशी घुसखोरांविरोधात मोहीम हाती घेतली आहे. बुधवार पेठ, शुक्रवार पेठ आणि आंबेगाव येथून 16 बांग्लादेशी नागरिकांना ताब्यात घेण्यात आले होते. यातील महिलांना मुंढवा येथील शासकीय महिला सुरक्षागृहात ठेवण्यात आले होते.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान 30 पूर्णांक 2 तर किमान तापमान 22 पूर्णांक 3 दशांश अंश सेल्सियस नोंदवलं गेलं. उद्या आकाश साधारण ढगाळ राहून हलक्या पावसाचा अंदाज आहे, घाट परिसरात मुसळधार पावसाची शक्यता पुणे वेधशाळेनं वर्तवली आहे.

**तर हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**